N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** जुना राजवाडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0677 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/11/2024 14:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 10/01/2024
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/06/2024
**Time From (वेळेपासून):** 12:03 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 07/11/2024 **Time (वेळ):** 14:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 013
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/11/2024 14:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सहायक आयुक्त, अन्न औषध प्रशासन,852/8 बी वर्ड, रघूकुल बिल्डीं,सुभाष रोड, कोल्हापूर
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निखील मधुकर माळकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा 1818, सी वार्ड, शिवाजी चौ, कोल्हापुर ,जुना राजवाडा,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा 1818, सी वार्ड, शिवाजी चौ, कोल्हापुर ,जुना राजवाडा,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850839839

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश रामचंद्र मासाळ अन्न सुरक्षा अधिकारी वर्ग-2 | | | 1. अमेय वैभव रेसिडन्सी बिल्डीग, पोटोळेवाडी,ई वर्ड कोल्हापुर, जुना राजवाडा,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि दिनांक 07/11/2024

मी निखील मधुकर माळकर, वय - 41 वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा. 1818, सी वार्ड, शिवाजी चौक, कोल्हापूर मो. नं. 9850839839 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहून फिर्याद देतो की,

मी दिनांक 08/01/2024 रोजी अँन्टी करप्शन कार्यालय कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री. सरदार नाळे यांचे कार्यालयात येवुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, माझा रामचंद्र बाबाजी माळकर या नावाने स्वीट मार्ट चा व्यवसाय आहे. सदर व्यवसाय करीत असताना अन्न औषध प्रशासन कार्यालय, कोल्हापूर येथील अधिकारी हे आमचे वरील स्वीट मार्ट मध्ये तपासणी करीता वारंवार येत असतात. दिनांक 07/09/2023 रोजी अन्न सुरक्षा अधिकारी श्री माशाळ साहेब यांनी माझे वरील स्वीट मार्ट दुकानाची तपासणी करून माझे वरती केस केली होती. सदरची केस ही न्यायनिर्णय अधिकारी अन्न औषध प्रशासन, म.रा.पुणे यांचे समोर चालु आहे. सदर केसचे अनुषंगाने मला दिनांक 22/11/2023 रोजी हजर राहणेबाबत नोटीस आली होती परंतु सदरची नोटीस मला 28/11/2023 रोजी मिळालेने मी हजर राहीलो नाही. त्यानंतर मागच्या आठवडयात माशाळ साहेब मला भेटले त्यावेळी त्यांनी माझे स्विट मार्ट वरती केलेली केस तडजोड करून मिटवतो असे सांगुन त्यासाठी त्यांनी माझेकडे 30,000/- रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना यातील रक्कम कमी करा अशी विनंती असता त्यांनी ठिक आहे असे म्हणुन 20,000/- रूपये दिले तरच मग केस मिटवुन देतो असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने पैशांची जुळणा करून भेटतो असे सांगितले होते. मी महेश माशाळ, अन्न सुरक्षा अधिकारी यांना दिनांक 10/01/2024 रोजी सकाळी 12.00 वा चे सुमारास भेटणेस जाणार असुन त्यांचेवर कारवाई व्हावी म्हणुन अर्ज दिला. त्यावेळी नाळे साहेबांनी मला दिनांक 10/01/2024 रोजी ऑफीसला येण्यास सांगितले.

दिनांक 10/01/2024 रोजी मी अँन्टी करप्शन ऑफीसमध्ये 11.30 वा चे सुमारास आलो त्यावेळी साहेबांनी माझी दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी तक्रार सांगितली. त्यानंतर नाळे साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन महेश माशाळ, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न औषध प्रशासन कार्यालय, कोल्हापूर यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना माशाळ यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. त्यावेळी तेथे माझी व माशाळ साहेब यांची भेट झाली त्यावेळी आमचेत माझे स्विटमार्ट दुकानावर केलेल्या कारवाईच्या केसचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी माशाळ साहेब ठीक हाय हे बघा ते कस असलय माहिती हाय का ते दंड आणि साहेबांच मिळून एक... तीस पर्यंत तुमची तयारी ठेवा काय आडचण नाही. कस होतय काय अंदाज सांगु मी कमी सांगुन तुम्ही त्या तयारीन राहणार आणि मला म्हणनार साहेब एकदम अचानक कस काय झाल असा विशय असतोय त्यामुळ तिथ असे म्हणाले. त्यावेळी मी तीस हजार लयच होतय हो असे म्हणालो. त्यानंतर त्यांनी सदर केसचे कामकाज पुणे येथे जॉईंट कमिशनर यांच्यापुढे चालणार असून त्यांच्याकडून माझ्या केसचा निकाल लावुन देण्यासाठी माशाळ साहेब यांनी माझेकडे एकुण 30,000/-रू. दयावे लागतील असे म्हणुन त्यातील काही केसच्या दंडासाठी व उर्वरित राहिलेले पैसे जॉईंट कमिशनर यांना दयावे लागतील असे म्हणाले. तसेच त्याकरीता महेश माशाळ हे पुणे येथे पुढील आठवडयात जावून जॉईंट कमिशनर यांना भेटून त्यांना माझ्या केसबाबत विचारून ते काय सांगतात ते पाहून मला सांगणार आहेत असे बोलले. त्यानंतर मी व पंच नं.01 तेथुन अँन्टी करप्शन ऑफिसमध्ये परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. श्री महेश माशाळ हे पुढील आठवडयात पुण्याला जावून तेथ जॉईंट कमिशनर यांना भेटून माझे केसबाबत नेमके किती रूपये दयावे लागतील हे सांगणार असल्याने महेश माशाळ यांचा मला निरोप आल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे ठरविले.

दिनांक 21/02/2024 रोजी मी नाळे साहेबांना भेटुन त्यांना अन्न सुरक्षा अधिकारी माशाळ साहेबांना माझे कामाचे अनुषंगाने पुणे येथे जावुन आले अगर कसे तसेच कामाचे काय झाले याबाबत विचारणा करण्यासाठी भेटणार आहे असे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी पंच तसेच स्टाफ यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्हाला योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना माशाळ यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. त्यावेळी तेथे माझी व माशाळ साहेब यांची भेट झाली. त्यावेळी आमचेत कामासंदर्भात बोलणे झाले. त्यावेळी माशाळ यांनी मला माझेवर असलेल्या केसचे कामकाज पुणे येथे जॉईंट कमिशनर यांच्यापुढे चालणार असून तेथील अधिकारी यांची बदली झाली असून बदली झालेल्या अधिकारी यांना ते भेटून माझे केसबाबत बोलणे करून निकाल लावून दंड किती व त्यांची फी किती असे म्हणाले त्यावेळी मी माशाळ यांना तुम्ही पुर्वी तीस हजार रूपये सांगितले होते त्यात काहीतरी मायनस करा असे म्हणालो त्यावेळी माशाळ यांनी पुण्याचे साहेब किती सांगतील तेवढे पैसे द्यावे लागतील असे म्हणुन त्यांनी पुण्याचे ऑफीसमधील क्लार्क अमोल यांना फोन लावुन माझे केसेबाबत ते बोलले. त्यावेळी मी त्यांना तीस हजाराची जुळणा करतो असे म्हणाल्यानंतर माशाळ यांनी बरं ठिक आहे असे म्हणाले. त्यानंतर आम्ही अॅन्टी करप्शनचे ऑफीसमध्ये परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. श्री महेश माशाळ हे पुण्याला जावून तेथे जॉईंट कमिशनर यांना भेटून मला पैश्याबाबत निरोप देणार आहेत त्यांनी बोलविलेनंतर पुढील कारवाई करण्याचे ठरविले.

दिनांक 19/04/2024 रोजी मी नाळे साहेबांना भेटुन त्यांना मी आज रोजी अन्न सुरक्षा अधिकारी माशाळ साहेबांना माझे कामाचे अनुषंगाने पुणे येथे जावून आले अगर कसे तसेच कामाचे काय झाले याबाबत विचारणा करण्यासाठी भेटणार आहे असे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी पंच तसेच स्टाफ यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्हाला योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं. 1 यांना माशाळ यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. त्यावेळी माशाळ साहेब ऑफीसमध्ये नव्हते म्हणुन मी त्यांना माझे फोनवरून त्यांचा मोबाईल क्रमांक 7620952962 वरती फोन केला परंतु त्यांनी फोन उचलला नाही त्यानंतर काहीवेळाने माशाळ साहेब यांचा मला फोन आला त्यावेळी माशाळ साहेब यांनी मला ते कोर्टात असुन कोर्टाच इलेक्शनची काम आहेत असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना माझे कामाच काय झाले असे विचारले त्यावेळी त्यांनी काही सुध्दा नाही बघा आता साहेब जॉइन झालेत पंधरा तारखेला मी ते क्लार्क ला विचारले ते गेल्याशिवाय निकालच देत नाहीत, दीड महिना झाल सगळयांना त्रास झालाय, मंत्री कार्यालयातुन त्यांना त्रास दिलेत त्यामुळ ते फार चिडलेल्या मनस्थितीत आहेत, माझ पंधरा तारखेला त्या क्लार्कशी बोलण झाल, ते म्हणाले साहेब त्या पार्टीला पार्टीला पाठवा जे कोण येणार हाईत ते, काय हाय ते साहेब त्यांना सांगतिल, दंड भरून जावुदेत मग, मला दोन महिने आता इलेक्शन मुळ हालता येत नाही असे म्हणुन त्यांनी मला तुम्ही स्वतः जावा व साहेबांना डायरेक्ट भेटा काय अडचण आली तर मला सांगा त्यानंतर ते साहेबांशी बोलतो असे बोलुन त्यांनी फोन बंद केला. त्यानंतर आम्ही अॅन्टी करप्शनचे ऑफीसमध्ये परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. माशाळ, यांनी मला पुण्याचे ऑफीसला जावुन भेटा तेथे ते सगळी लिंक दाखवतो म्हणजे पुढ हे करून देतो, क्लार्क जोडुन देतो तुम्ही डायरेक्ट साहेबांना भेटा काय आडचण आली तर त्यांना सांगा त्यानंतर ते साहेबांशी बोलतो असे बोलले परंतु त्यांनी कोणास भेटा अगर कोणता क्लार्क जोडुन देतो हे सांगितले नसलेने पुन्हा माशाळ साहेब यांची भेट घेवुन त्यांना सदरबाबत विचारणा करणे आवश्यक असलेने माशाळ साहेबांची पुन्हा भेट घेवुन पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक 18/06/2024 रोजी मी नाळे साहेबांना भेटुन त्यांना मी आज रोजी अन्न सुरक्षा अधिकारी माशाळ साहेबांना माझे कामाचे अनुषंगाने भेटणार आहे असे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी पंच तसेच स्टाफ यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्हाला योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना माशाळ यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. त्यावेळी मी माशाळ साहेब हे कार्यालयात नसलेने त्यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 7620952962 वरती फोन लावला असता त्यांनी ते आताच कार्यालयातुन बाहेर गेले असल्याचे सांगुन गडबड असल्याचे सांगुन आपण भेटुया मी उदया किंवा परवा तुम्हाला कॉल करतो तसेच काय काळजी करू नका मी सगळ सॉर्ट आऊट करणार असे असे बोलुन त्यांनी फोन बंद केला. त्यानंतर आम्ही अॅन्टी करप्शनचे ऑफिसमध्ये परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. माशाळ, साहेब यांनी मला उदया किंवा परवा कॉल करतो असे म्हणालेने माशाळ यांचा मला कॉल आलेनंतर पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक 25/06/2024 रोजी मी नाळे साहेबांना भेटुन त्यांना सांगितले की, दिनांक 18/06/2024 रोजी झालेल्या पडताळणी कारवाईवेळी माशाळ साहेब यांनी मला उदया परवा कॉल करतो असे म्हणाले होते त्याप्रमाणे त्यांचा दोन दिवसापुर्वी मी घरी असताना मला फोन आलेला होता त्यावेळी माशाळ साहेब यांनी मला माझे

कामबाबत पुण्याला जायची गरज नाही येथेच काय असेल ते अ◌ॅडजस्ट करतो असे म्हणाले होते. त्याबाबत मी आज रोजी त्यांना भेटुन माझे कामाबाबत बोलणार आहे असे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी पंच तसेच स्टाफ यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्हाला योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना माशाळ यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. त्यावेळी माझी व माशाळ साहेबांची भेट झाली त्यावेळी आमचेत मला आलेल्या नोटीसचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी मी त्यांना पुण्याच जावुदे तुम्ही म्हणला होता की पुण्याच जावुदे इथच करूया म्हणुन हितच करूया म्हणला होता की असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी हित होत नाही असे म्हणाले. त्यावेळी त्यांनी मला पुणे येथे यावे लागेल तसेच मला येता येत नसेल तर दुस-याचे नावे प्राधिकार पत्र दयावे लागेल असे म्हणाले त्यानंतर आमचेत लायसन्स चे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी मी मला काय म्हणायच येवढ दंड बिंड तुम्ही आता म्हणालाय तीस पस्तीस पर्यत जातय देवुन टाकुया आणि क्लिअर करून टाकुया ना असे म्हणालो. त्यावेळी माशाळ मी त्या बददल साहेबांच काही म्हनण नाही हो, पण हया प्रोसेसला ते लागतात कोणीतरी तिथ तो माणुस कोण उभा करायाचा असे म्हणाले त्यावेळी मी ते दंडाच झाल आणि मग हेच असे म्हणालो. त्यावेळी माशाळ कशाच नाही नाही तेच की त्यातल काय करणार त्यातल साहेबांना थोड देणार आणि दंड थोडा दाखवणार, ते त्या मध्ये मी मिटवतो त्याबददल काही विषय नाही पण कोणी तरी एक असे म्हणाले. त्यावेळी आमचेत पुणे येथे कसे जावावे याबाबत चर्चा झाली. त्यावेळी माशाळ साहेबांनी मला पंधरा वीस दिवसांनी दौरा काढु असे म्हणाले. त्यावेळी माशाळ आपण जायच्या आदल्या दिवशी मी साहेबांना फोन करू शकतोय सर आस एक केस नंबर हाय आपल्याला मिटवायच हाय काही आडचण नाही. ते मी त्याजा करीन निपटारा आदल्या दिवशी सांगुन, फक्त आता काय करूया पाच तारखे पर्यत काय हालता येत नाही असे म्हणाले. त्यावेळी मी चालतय की असे म्हणुन त्यावेळीस किती घेवुन जायला लागतील तरी असे म्हणालो. त्यावेळी माशाळ आता जे आपण ठरलेल आहेत ते सां◌ेबत राहुदेत काही आडचण नाही तिथ कस होतय असे म्हणाले. त्यावेळी मी कमी जास्त व्हायला नको असे म्हणालो. त्यावेळी माशाळ हा...तिथ अ◌ॅडजेस्ट करता येईल तेजा काय विषय नाही पण फक्त कस हाय तेची जी कंडिशन हाय ती बघुन आपण अ◌ॅडजस्ट करू असे म्हणाले. त्यावेळी मी ते एकदा पेमेंट देवुन क्लेअर करून टाकुया असे म्हणालो. त्यावेळी माशाळ चालतय चालतय असे म्हणाले. त्यानंतर आम्ही अ◌ॅन्टी करप्शनचे ऑफीसमध्ये परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. माशाळ, साहेब यांनी मला पाच जुन नंतर पुणे येथे जाणेचे आहे त्यापुर्वी दोन दिवस आधी सांगतो असे म्हणालेने माशाळ यांचा मला कॉल, निरोप आलेनंतर पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक 15/10/2024 रोजी मी वैष्णवी पाटील पोलीस उप अधीक्षक अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांना भेटुन त्यांना यापुर्वी पडताळणी कारवाईवेळी माशाळ साहेब यांना भेटुन काय काय घडले याबाबत हकीकत सांगितली. त्यानंतर मी दिनांक 25/06/2024 रोजी झालेले पडताळणी कारवाईवेळी माशाळ साहेब यांनी मला माझे स्विट मार्टचे नोटीसचे दंडा बाबत तसेच बाकीच्या गोष्टीबाबत पुणे येथील साहेबांचे सोबत बोलुन घेतो. तसेच सदर केसेचे कामाकरीता पाच जुन नंतर माशाळ व मी पुणे येथे जावुन तेथे मला आले नोटीसचे दंडाबाबत तसेच तेथे किती पैसे दयायचे या बाकीच्या गोष्टीबाबत पुणे येथील साहेबांसोबत माशाळ बोलुन घेतो असे बोलले होते. त्यानंतर मला नाळे साहेब व साळुंके साहेब यांनी कारवाईसाठी बोलविले होते परंतु मी माझे खेळाचे व वैयक्तीक कामासाठी बाहेरगावी असलेने मला येता आले नाही तसेच त्या दरम्यान मी माशाळ साहेबांनी ही भेटलो नाही. दिनांक 23/08/2024 रोजी माशाळ साहेब यांनी मला फोन करून दिनांक 28/08/2024 रोजी अन्न औषध विभाग पुणे येथील ऑफीसला जावुन या असा फोन आलेला त्यानंतर दिनांक 27/08/2024 रोजी माशाळ यांचा पुन्हा मला फोन आला की, ते आजारी असुन पुणे येथे कधी जायचे आहे ते फोन करून सांगतो असे कळविले होते त्याप्रमाणे मी वेळोवेळी पोलीस निरीक्षक बापु साळुंके यांना कळविलेबाबत सांगितले. त्यानंतर मला माशाळ साहेब यांचा फोन आलेला की, दिनांक 04/09/2024 रोजी पुणे कार्यालयात सुनावणीसाठी हजर राहा त्याप्रमाणे मी दिनांक 04/09/2024 रोजी पुणे कार्यालय येथे हजर झालो. त्यावेळी तेथे सुनावणी होवुन मला दंड झाला असुन सदर दंडाची नोटीस पोस्टाने पाठवुन देतो असे त्यांनी मला कळविले त्यावेळी मी माशाळ यांना फोन करून पुणे येथे जावुन आलेचे व दंड झाला असुन दंडाची रक्कमेबाबत पोस्टाने कळवितो असे सांगितल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी माशाळ यांनी मला दंडाची नोटीस आलेनंतर दंड भरून त्यांना भेटणेबाबत सांगितले असल्याचे सांगितले. दिनांक 11/10/2024 रोजी मला पोस्टाने दंडाची नोटीस प्राप्त झाली असुन मी ऑनलाईन पध्दतीने मला झालेला 20,000/- रूपये दंड दिनांक 15/10/2024 रोजी भरला असुन आज दिनांक 15/10/2024 रोजी माशाळ साहेब यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी पंच तसेच स्टाफ यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्हाला योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना माशाळ यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. आम्ही कार्यालयात गेलो त्यावेळी मी तेथे

त्यावेळी माशाळ यांनी दंड भरलेबाबत एक
माशाळ साहेबांना भेटलो त्यावेळी मी त्यांना दंड भरलेबाबत सांगितले. त्यावेळी मी माशाळ यांना
कॉपी तिकडे पाठवा तसेच त्यांचे ऑफीसला दंड भरलेबाबत एक पत्र देणेस सांगितले. आता संपल की दंड भरला
केव्हा भेट दे तुम्हाला असे म्हणालो त्यावेळी माशाळ नाही नाही माझा काय विषय नाही, असे म्हणाले
आता माझा काय विषय नाही, फक्त एक पत्र देवुन ऑफिसला देवुन टाका तुमचा संपला विषय...असे म्हणाले
त्यानंतर आम्ही अॅन्टी करप्शनचे ऑफीसमध्ये परत येवुन पाटील मॅडम यांना सर्व हकीकत सांगितली. अन्न सुरक्षा
अधिकारी माशाळ यांनी मला दंड भरलेबाबतचा अर्ज घेवुन कार्यालयात देणेस सांगितल्याने मला दंड भरलेबाबतचा
अर्ज घेवुन पुन्हा अन्न औषध विभाग कोल्हापूर यांचे कार्यालयात पाठवुन तेथे अर्ज देवुन त्यावेळी तेथे माशाळ
साहेबांना त्यांनी सांगितलेप्रमाणे दंड भरलेबाबतचा अर्ज दिलेबाबत सांगुन त्यांनी यापुर्वी पुणे येथील साहेबांना किती
पैसे दयायचे याबाबत त्यांनी सांगितले होते त्याबाबत त्यांचेकडे पडताळणी करणे आवश्यक असलेचे सर्वांमते ठरले.

त्याप्रमाणे मला व पंच नं. 1 यांना योग्य त्या सुचना देवुन माशाळ यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात
पाठविले. आम्ही कार्यालयात गेलो परंतु तेथे माशाळ साहेब कार्यालयात नव्हते म्हणुन मी त्यांना त्यांचे मोबाईल
क्रमांक 7620952962 वरती चार वेळा फोन केला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. आम्ही तेथुन परत
कार्यालयात येवुन घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पुन्हा थोडयावेळाने आम्हाला पाटील मॅडम यांनी पुन्हा
माशाळ यांची भेट घेणेकरीता पाठविले. आम्ही कार्यालयात गेलो तेथे मी दंड भरलेबाबतचा अर्ज कार्यालयात
इनवर्डला दिला त्यानंतर माशाळ साहेब यांचेबाबत माहिती घेतली असता ते ऑफीसमध्ये नव्हते म्हणुन मी त्यांचे
मोबाईल क्रमांक 7620952962 वरती फोन लावला त्यावेळी मी हा सर ऑफिस मध्ये आलतो, बाहेर हाय, हं.
अर्ज दयायला आलतो तो हां...असे म्हणालो. त्यावेळी माशाळ हा चलन ऑनलाईन भरलेल हाय वरती कळवल काय
तिकड तुम्ही ऑनलाईन दंड भरलेल हाय म्हणुन...असे म्हणाले. त्यावेळी मी कळवल की...असे म्हणालो. त्यावेळी
माशाळ हां चालतय काय विषय नाही संपला विषय तुमचा तुमची फाईलच क्लोज झाली असे म्हणाले. त्यावेळी मी ते
नव्ह त खर आपले ते तेनी तीस हजार दयायला सांगितलेल ना मग ते वरच्या दहा हजाराच काय करायच...असे
म्हणालो. त्यावेळी माशाळ नाही नाही एैका एैका तो तशाला पैशाचा काय विषय काय काढायचाच नाही, काही
भानगड नाही ते तसल तुम्ही डोक्यात पण घेवु नका, आणि काय तसल बोलु पण नका, काय विषय नाही, तुमचा
आणखी...असे म्हणाले त्यावेळी मी नाही नाही आता आपल्या आपल्यात विषय चाललाय म्हणुन बोलालोय हो मी...
असे म्हणालो. त्यावेळी माशाळ एैका शासकिय दंड जो भरला ना तुम्ही...भरला ना ,संपला विषय आता काय
विषय नाही...असे म्हणाले. त्यावेळी मी आणि तुम्ही जे तीस हजार काढुन ठेवायला सांगितले म्हणुन मी ते तीस
हजार काढुन ठेवले...असे म्हणालो. त्यावेळी माशाळ नाही नाही नाही एैका तो तसला विषयच काढायचा नाही...
असे म्हणाले त्यावेळी मी नको...असे म्हणालो. त्यावेळी माशाळ मी कसली डिमांडही केली नाही काहीच विषय
नाही... कुणीच करायची नाही, चलन भरल जो शासकिय दंड हाये तो शासकिय दंड चलना व्दारे तुम्ही भरलेला
आहे. तुमची...असे म्हणाले. त्यावेळी मी आता वरती साहेबांना काय पैसे दयायची गरज नाही आपनाला...असे
म्हणालो. त्यावेळी माशाळ नाही नाही काही सुध्दा नाही, साहेबाला नाही ना काय नाही, तुम्हाला वरन दंड झाला
ना...असे म्हणाले. त्यावेळी मी हां...ओके सर म्हणालो व फोन बंद केला. त्यानंतर मी व तक्रारदार असे मिळून परत
येवुन आपणास भेटलो अशी हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही अॅन्टी करप्शनचे ऑफीसमध्ये परत येवुन पाटील
मॅडम यांना सर्व हकीकत सांगितली.

अन्न सुरक्षा अधिकारी माशाळ यांनी माझेकडे यापुर्वीच्या पडताळणी वेळी मला माझे में. रामचंद्र बाबाजी माळकर
स्वीट मार्ट वरती अन्न औषध प्रशासन कार्यालयाकडुन केले कारवाईबाबत आले नोटीसबाबत पुणे येथील जॉईंट
कमिशनर यांना भेटुन माझे केसचे दंडासाठी व उर्वरीत राहीलेले साहेबांना दयावे लागतील असे म्हणुन मला तीस
हजार रूपये तयार ठेवा असे सांगुन माशाळ यांनी त्यांचे वरीष्ठांकरीता माझेकडे दंडासह तीस हजार रूपये लाचेची
मागणी केली होती. परंतु आज रोजी मी माझे स्विट मार्टवर पुणे ऑफीसकडुन झालेला वीस हजार रूपये दंड
भरलेनंतर माशाळ साहेबांना भेटलो असता त्यांनी यापुर्वी पुणे येथील जॉईंट कमिशनर यांना दयावे लागतील म्हणुन
माझेकडे मागणी केलेले पैसे घेण्यास नकार दिला आहे. अन्न सुरक्षा अधिकारी माशाळ हे मला भेटण्यास टाळाटाळ
करीत आहेत तसेच भेटल्यावर मला टाळत असल्याचे तसेच त्यांनी यापुर्वी माझेकडे पुणे येथील साहेबांचेकरीता
मागणी केलेले पैसे ते आता घेणार नाहीत याची मला खात्री झाली आहे.

तरी महेश माशाळ अन्न निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन विभाग कोल्हापूर जि.कोल्हापूर यांनी माझे में. रामचंद्र
बाबाजी माळकर स्वीट मार्ट वरती अन्न औषध प्रशासन कार्यालयाकडुन केले कारवाईबाबत आले नोटीसबाबत पुणे
येथील जॉईंट कमिशनर यांना भेटुन माझेवर झाले केसचे दंडासाठी व उर्वरीत राहीलेले पैसे साहेबांना दयावे लागतील
असे म्हणुन मला तीस हजार रूपये तयार ठेवा असे सांगुन माशाळ यांनी त्यांचे वरीष्ठांकरीता माझेकडे मला आले
नोटीसवरती काही पैसे दंड व उर्वरीत पैसे त्यांचे पुणे येथील साहेबांना दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे तीस

हजार रूपये लाचेची मागणी मागणी केली आहे म्हणून श्री.महेश माशाळ अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभाग, कोल्हापूर याचेविरूध्द माझी फिर्याद आहे.
माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANJEEVKUMAR DATTARAYA ZADE(I (Inspector)) / 14601000450SDZM7601Y **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.** **(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
जुना राजवाडा पोलीस ठाणे, कोल्हापूर
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SANJEEVKUMAR DAT

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** 14601000450SDZM760